मतदार नोंदणी अधिकारी

१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ

पत्ता : महामानव शिव शाहू फुले आंबेडकर स्मृती सभागृह, बेथनी हॉस्पिटलच्या बाजूला पोखरण रोड नं २ ठाणे (प) ४००६०६

ईमेल - १४६election२०२४@gmail.com

जा.क्र./निवडणूक/ कावि- ८९७/२०२६ दिनांक-२३/११/२०२६

प्रति,

१) जनसंपर्क अधिकारी,
ठाणे महानगरपालिका

२) जनसंपर्क अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय:- <u>विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६</u>
(सोबत दिलेली प्रेस नोट वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत)

संदर्भ:-मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. ईएलआर-२०२६/प्रक्र. ७०/दि. १८/११/२०२६

मा. भारत निवडणूक आयोग यांच्याकडील निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा (SIR) कार्यक्रम जाहीर झालेला आहे. सध्या चालू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षणांतर्गत, ज्या मतदारांना गणना प्रपत्र निर्गमित करुनही त्यांची नावे ASDD (Absence. Shifted, Dead, Duplicate) या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आल्यामुळे प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट करता आलेली नाहीत अशा मतदारांना त्यांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी आणखी एक संधी देण्याचा निर्णय मा. भारत निवडणूक आयोगाने घेतलेला आहे.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने या पत्रासोबत दिलेली प्रेस नोट वृत्तपत्रामध्ये, आपले कार्यालयाचे विविध हॅंडल्स वर तसेच आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या कार्यालयास अहवाल सादर करण्यात यावा.

(राजेंद्र चव्हाण)
मतदार नोंदणी अधिकारी
१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ

प्रत -१) मा.अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, ठाणे / मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे माहितीसाठी.
२) मा.उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे माहितीसाठी.
३) सहा.आयुक्त,माजिवडा-मानपाडा/वर्तक नगर/प्रभाग क्र.३,४,६ मिरा भाईंदर प्रभाग समिती यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

- प्रेस नोट -

मा. भारत निवडणूक आयोग यांच्याकडील निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा (SIR) कार्यक्रम जाहीर झालेला आहे. सध्या चालू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षणांतर्गत, ज्या मतदारांना गणना प्रपत्र निर्गमित करुनही त्यांची नावे ASDD (Absence, Shifted, Dead, Duplicate) या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आल्यामुळे प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट करता आलेली नाहीत अशा मतदारांना त्यांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी आणखी एक संधी देण्याचा निर्णय मा. भारत निवडणूक आयोगाने घेतला आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ (SIR) वेळापत्रक

अ.क्र	कार्यवाही	कालावधी
१	गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन	दिनांक.३०.११.२०२६ पर्यंत
२	गणना प्रपत्रे (EF) निकाली काढणे	दिनांक.१०.१२.२०२६ पर्यंत

(राजेंद्र चव्हाण)
मतदार नोंदणी अधिकारी
१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघ

ठिकाण - ठाणे
दिनांक.२३.११.२०२६